प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
# पुढारी
www.pudhari.com




अर्जुननगर : निवड झालेल्या विद्यार्थ्यांसमवेत प्राध्यापक.

# देवचंद कॉलेजच्या ४ विद्यार्थ्यांची निवड

**निपाणी : पुढारी वृत्तसेवा**

अर्जुननगर येथील देवचंद कॉलेजच्या संगणक शास्त्र विभागातील ४ विद्यार्थ्यांची सुप्रसिद्ध क्विक फाऊंडेशनतर्फे क्लब ऑफिसर म्हणून निवड करण्यात आली. क्लब ऑफिसर म्हणून निवड झालेलले ४ विद्यार्थी व २६ सायबर वॉरियर्स यांना निडसोशी येथे पार पडलेल्या कार्यक्रमात गौरविण्यात आले.

हर्षवर्धन जबडे याची प्रेसिडेंट ,समृद्धी भराडे हिची सेक्रेटरी, अलोक कांबळे यांची मीडिया डायरेक्टर व अर्थव माने याची कम्युनिटी डायरेक्टर या उपक्रमासाठी आणि प्रा. प्रशांत कुंभार यांची समन्वयक म्हणून निवड करण्यात आली. निवड झालेले विद्यार्थी पुढील दोन महिने कॉलेज परिसर, शाळा, महाविद्यालये आणि समाजातील विविध घटकांना सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करणार आहेत. उपक्रमातून क्विक हिल फाऊंडेशन-पुणे आणि देवचंद कॉलेज या दोन संस्थांमध्ये 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा : कमवा व शिका' या उपक्रमांतर्गत सामंजस्य करार करण्यात आला आहे. या उपक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष आशिषभाई शाह यांचे प्रोत्साहन तर प्राचार्या डॉ. जी. डी. इंगळे, उपप्राचार्य डॉ. पी. पी. शाह यांचे मार्गदर्शन मिळाले.

My Belgaum Edition Edition
Aug 09, 2024 Page No. 03
Powered by: